दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे  संपादक : बंडूभाऊ इंगोले  RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३१७ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## बिटोडा तेली येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**वाशिम :-** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, बहुजन प्रतिपालक, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती बिटोडा तेली येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. गावातील नागरिक, युवक, महिला व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवरायांना अभिवादन केले.कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी गावातील मान्यवरांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. "जय शिवाजी, जय भवानी" च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला आणि संपूर्ण वातावरण शिवमय झाले.कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर भाषणे केली. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेले पराक्रम, त्यांचे शौर्य, न्यायप्रियता व लोककल्याणकारी धोरण याबद्दल विद्यार्थ्यांनी माहिती दिली. त्यांच्या विचारांवर चालण्याचे आणि समाजासाठी कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.गावातील मान्यवरांनी आपल्या भाषणात सांगितले की, शिवाजी महाराज हे केवळ एक राजा नव्हते, तर ते आदर्श नेतृत्वाचे प्रतीक होते. त्यांनी सर्व समाजघटकांना एकत्र घेऊन स्वराज्य उभे केले. त्यांचे विचार आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या मार्गावर चालणे ही काळाची गरज आहे.कार्यक्रमाच्या शेवटी संपूर्ण कार्यक्रम शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमासाठी गावातील युवक मंडळ, आणि पंचशिल नवयुवक मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले.छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त बिटोडा तेली गावात अभिमान, प्रेरणा आणि ऐक्याची भावना निर्माण झाली असून शिवरायांचे विचार जनमानसात रुजवण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. सदरील कार्यक्रमाला मिलिंद खरात, संदीप खडसे, किरण खडसे, स्वप्नील खडसे, अरुण भगत, गणेश भालेराव, सचिन भगत, महिला मंडळ आणि समस्त गांवकरी उपस्थित होते

## महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा निर्धार; 2047 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य



**मुंबई :** राज्य विधानमंडळाच्या २०२६ च्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभी राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून राज्य सरकारच्या विविध विकासात्मक उपक्रमांचा आढावा घेतला. "विकसित महाराष्ट्र - २०४७" या दूरदृष्टी आराखड्याअंतर्गत राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

राज्याने २०२४-२५ या वर्षात १,६४,८७५ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करून देशात प्रथम क्रमांक मिळवला असून, ही एकूण एफडीआयपैकी ३९ टक्के आहे. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत सुमारे ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून सुमारे ४० लाख रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

"महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५" अंतर्गत ७० लाख ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ५० लाख रोजगारांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच स्टार्टअप धोरणाद्वारे पुढील पाच वर्षांत १,२५,००० उद्योजक घडविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १,१०० कि.मी. लांबीच्या १४७ रस्ते प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून, समृद्धी महामार्गाचा विस्तार वाढवण बंदर व पूर्व विदर्भापर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. "महा-इन्व्हिट" उपक्रमाद्वारे पायाभूत प्रकल्पांसाठी खासगी गुंतवणुकीस चालना दिली जाणार आहे.

शेती क्षेत्रासाठी विविध महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आले. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज पुरवठा, ६.६३ लाख सौर पंपांची स्थापना, किमान आधारभूत किंमतीत कापूस व सोयाबीन खरेदी, तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना १५,५७६ कोटी रुपयांची मदत थेट खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी "उमेद" अभियानांतर्गत ६.६० लाख स्वयं-सहायता गट स्थापन करण्यात आले असून, २६ लाखांहून अधिक महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत. आदिवासी महिलांसाठी "राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना" सुरू करण्यात येणार आहे.

आरोग्य क्षेत्रात अवयव प्रत्यारोपणासाठी ९ प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सर्वसमावेशक कर्करोग उपचार सेवा धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## कळंबोली रोडपाली येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी



**अविनाश जाधव वार्ताहर /रोडपाली कळंबोली प्रतिनिधी:-** प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या थाटामाटात छत्रपती शिवाजी महाराज यांची 392 वी जयंती पनवेल तालुक्यातील रोडपाली येथे साजरी करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज यांची सकाळी स्थापना करून पूजा अर्चना करण्यात आली त्यानंतर दुपारी बारा वाजता शिवचरित्रावर व्याख्यान ठेवण्यात आले. गावातील सर्व गावकऱ्यांनी या शिवाजी महाराजांवर व्याख्यानाला भरपूर प्रतिसाद दिला. त्यानंतर गावातील भजनी मंडळांनी शिवजयंती निमित्ताने शिवाजी महाराजांचा पोवाडा तसेच त्यांची गौरवगाथा व शिवाजी महाराजांचा पाळणा म्हणून संगीत शरीमनीचा कार्यक्रम करण्यात आला होता.

सायंकाळी पाच वाजता गावातील लहान मुलांनी विविध पोशाखामध्ये जसे की कोणी शिवाजी महाराज, कोणी मावळा, कोणी जिजाऊमाता, कोणी येसूबाई अशा विविध पोशाखामध्ये येऊन शिवजयंती साजरी केली. गावांमध्ये जनतेने शिवाजी महाराजांची पालखी मिरवणूक काढली होती पालखी मिरवणूक नंतर बक्षीस वितरण व शिवाजी महाराजांवरती भाषण करून लहान मुलांनी यात सहभाग घेतला.

विशेष जयंती साजरी करण्यासाठी शिवबा प्रतिष्ठान रोडपाली व सर्व ग्रामस्थ यांनी शिवजयंती 19 वर्ष ही शिवजयंती ग्रामस्थ तर्फे साजरी करण्यात येत आहे. शिवबा प्रतिष्ठानच्या वतीने ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे व शिवप्रतिथांच्या सर्व कार्यकर्त्यांचे मोलाचे योगदान शिवजयंतीसाठी लाभले.

## दिव्यात कचऱ्याचा डोंगर; ठाणे महापालिकेचे दुर्लक्ष, नागरिकांचे आरोग्य वाऱ्यावर!

### सद्गुरू नगर, मुंब्रा देवी कॉलनी रोड परिसरातील धक्कादायक चित्र; रोगराईची दाट शक्यता



**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) दिवा (ठाणे) :** ठाणे महानगरपालिका एकीकडे 'स्वच्छ सर्वेक्षण' आणि 'स्मार्ट सिटी'चा डंका पिटत असताना , दुसरीकडे मात्र दिवा शहरात स्वच्छतेचा पार बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. दिव्याच्या सद्गुरू नगर, मुंब्रा देवी कॉलनी रोड परिसरात कचऱ्याचे अक्षरशः डोंगर साचले असून, महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचा गलथानपणा चव्हाट्यावर आला आहे. या साचलेल्या कचऱ्यामुळे नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले असून, संपूर्ण परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे.

दिवा परिसरातील रिलायन्स टॉवर जवळ, दत्त मंदिर समोर असलेल्या रस्त्यावरच कचऱ्याचा महाकाय ढिगारा साचला आहे. सुका आणि ओला कचरा, प्लास्टिकच्या पिशव्या आणि टाकाऊ वस्तू उघड्यावर सडत असल्याने या भागात भीषण दुर्गंधी पसरली आहे. रस्त्याच्या मधोमध हा कचरा साचल्याने पादचाऱ्यांना, विशेषतः शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना नाक मुठीत धरूनच या भागातून ये-जा करावी लागत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या ठिकाणचा कचरा नियमितपणे उचलण्यात आलेला नाही. उघड्यावर कुजणाऱ्या या कचऱ्यामुळे डास आणि माश्यांचा प्रादुर्भाव प्रचंड वाढला आहे. परिणामी, डेंग्यू, मलेरिया, टायफॉइड यांसारख्या साथीच्या आजारांचा फैलाव होण्याची दाट भीती स्थानिक रहिवाशांकडून व्यक्त केली जात आहे. भटकी कुत्री आणि जनावरे अन्नाच्या शोधात हा कचरा आणखी विस्कटत असल्याने संपूर्ण रस्ताच कचरामय झाला आहे. ठाणे महापालिकेचे आरोग्य विभाग आणि दिवा प्रभाग समिती या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. कर भरूनही जर नागरिकांना स्वच्छतेसारख्या मूलभूत सोयी-सुविधा मिळत नसतील, तर दाद कोणाकडे मागायची, असा संतप्त सवाल दिवावासीयांकडून उपस्थित केला जात आहे. महापालिका प्रशासनाने तातडीने या कचऱ्याची विल्हेवाट लावून रस्ता मोकळा करावा आणि परिसरात तातडीने जंतुनाशक फवारणी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. आता तरी महापालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी जागे होऊन कारवाई करणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## पुणे येथे 22 फेब्रुवारी गोर बंजारा तीर्थक्षेत्र मंदिर स्थापना लोकार्पण सोहळा व कलशारोहण भव्य दिव्य कार्यक्रम सपन्न.!





**प्रतिनिधी शाम जगताप :** गोर बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज, माता जगदंबा माता यांचे भव्य दिव्य मंदिर पुणे जिल्ह्यातील दिघी,भोसरी येथे निर्माण झाले असून याचं औचित्य साधून दि.22 फेब्रुवारी गोर बंजारा तीर्थक्षेत्र मंदिर स्थापना व कलशारोहण भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमास गोर बंजारा समाजाचे पोहरादेवी धर्मगुरू शेखर महाराज व राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थित मध्ये सपन्न झाले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून धर्मगुरू रायसिंग महाराज, महंत सिद्धलिंग महाराज, महंत हिमत महाराज,उद्योजक संतोष पवार, नगरसेवक नितीन काळजे,सचिन तापकीर,सचिन लांडगे, कविताताई भोंगाळे, उद्योजक सुबोध पवार,सह धार्मिक क्षेत्रातील व विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य दिव्य कार्यक्रम तीन दिवसीय आयोजित करण्यात आले होते दि.20 - 21 फेब्रुवारी व 22 फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यक्रम गोर बंजारा तीर्थक्षेत्र मंदिर स्थापना व कलशारोहण झाले या मध्ये भव्य मिरवणूक रॅली, आतिषबाजी, बंजारा भजनाचा कार्यक्रम, महाआरती, होम हवन, आरती महाप्रसाद आणि दर्शन सोहळा सपन्न झाले शेकडो बंजारा महिला समाज बांधव युवक वर्ग या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. "गोर बंजारा तीर्थक्षेत्र दिघी भोसरी पुणे येथे" मातो टिकेर जागा निर्माण हेगीछ" गोर बंजारा समाजाच्या धर्मसत्ता मजबूत करण्यासाठी संत सेवालाल महाराज,माता जगदंबा माता आणि धर्मगुरू रामराव महाराज यांच्या विचार जगभर पोहचण्यासाठी "मंदिर" निर्माण करून त्या पवित्र ठिकाणांहून समाजाला एकसंघ करून संतांचे विचार जगभर पोहचण्यासाठी आणि सामाजिक एकोपा निर्माण करण्यासाठी आणि हिताचे कार्य घडेल त्या साठी मी मंत्री म्हणून जे ही मंदिर निर्माणासाठी मदत करता येईल ते मी करेल आणि समाजाच्या उन्नतीसाठी न्याय हक्क अधिकारासाठी मी सदैव तत्पर असून समाजानी माझ्यावर विश्वास ठेवावा सर्व प्रश्न मार्गी लावण्याची जबाबदारी माझी असेल असे मत राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केले. या वेळी धर्मगुरू शेखर महाराज , महंत सिद्धलिंग महाराज, धर्मगुरू रायसिंग महाराज महंत हिमत महाराज,यांनी समाजाला दिशा देण्यासाठी व मंदिर निर्माण करून धर्मसत्ता मजबूत करून समाजाचा विकास साधता येईल आणि समाज बांधवांनी वाईट व्यसना पासून दूर राहवे असे आपल्या आशीर्वात भाषणात त्यांनी आपले मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रस्तावना भाषणात पुणे जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण सांस्कृतिक धार्मिक स्थळ उभे करण्यासाठी मंत्री संजय राठोड यांनी विशेष लक्ष पुणे जिल्ह्यात द्यावे असे मत राष्ट्रीय बंजारा परिषदचे प्रदेश प्रवक्ता अमोल पवार यांनी व्यक्त केले.व मंदिर कमिटीच्या वतीने किशोर चव्हाण,विठ्ठल चव्हाण ,भारत जाधव ,रामसिंग खेतावत, परशुराम पवार व सर्व मंदिर कमिटी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत सत्कार करून आभार व्यक्त केले आहे.सूत्रसंचालन रमेश राठोड,किशोर चव्हाण यांनी केले तर आभार पवन चव्हाण , मिथुन राठोड यांनी मानले आहे.

## तर्पण फाउंडेशन ची नाशिक मध्ये बैठक संपन्न



**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** अनेक वर्षापासून तर पण फाउंडेशन अनाथ मुलांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात आमदार श्रीकांत भारतीय यांच्या मार्गदर्शनात काम करत आहे तर्पण फाउंडेशन च्या माध्यमातून आज पोहत हजारो विद्यार्थी तर्पण परिवाराचा भाग झाले आहे

आज नाशिक येथे तर्पण फाउंडेशनच्या डायरेक्टर व असोसिएट डायरेक्टर यांची तर्पण चे पुढील कामकाज ठरवण्यासाठी बैठक पार पडली यात प्रामुख्याने नासिक येथे तर्पण चे विभागीय कार्यालय, निधी संकलन, बालगृहांना भेट, सोशल मीडियाचा प्रचार प्रसार अशा विविध विषयांवर चर्चा झाली यावेळी अमित जाधव यांच्या सह संजय पिसे,स्वप्निल खैरनार,प्रशांत बडगुजर, पंकज शेलार, सोशल मीडियासाठी सेजल बोडके, रोहित पोरजे, आदित्य शेजवळ आदी उपस्थित होते

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भेरा येथे संत गाडगेबाबा जयंती साजरी



**वाशिम (प्रतिनिधी) :** मालेगाव तालुक्यातील जि.प.प्राथ.शाळा भेरा शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेचे मुख्याध्यापक देवानंद मोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली संत गाडगेबाबा जयंती साजरी केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित सर्व शिक्षकांनी व विद्यार्थिनींनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यार्थ्यांमधुनच प्रेम भगत हा विद्यार्थी होता.तर प्रमुख पाहुणे म्हणून कु,आदिती तागड,कु.राधिका देशमुख,कु.इशिता वानखेडे हे विद्यार्थी होते यावेळी प्रेम भगत,आदिती तागड, राधिका देशमुख,इशिता वानखेडे,अथर्व देशमुख, उत्कर्ष गुडधे, अजिंक्य राऊत, रूद्र तागड, श्रद्धा शिंदे,नयन शिंदे,इत्यादी विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर भाषणाच्या माध्यमातून प्रकाश टाकला आहे.

## संपादकीय

### देशाचे 'इव्हेंटमय'करण थांबलेच पाहिजे

दिल्लीतील एआय इम्पॅक्ट समिटमध्ये उघडकीस आलेला गलगोटिया प्रकार हा एखाद्या संस्थेचा स्वतंत्र घोटाळा म्हणून पाहून चालणार नाही. हा प्रसंग आपल्या शासनपद्धतीच्या गुणवत्ता-मानकांची आणि उत्तरदायित्वाची कसोटी आहे. विकास ही केवळ प्रकाशझोतातील घोषणा किंवा आकर्षक सादरीकरणांची मालिका नसते; ती काटेकोर अंमलबजावणी, पारदर्शक निर्णयप्रक्रिया आणि संस्थात्मक जबाबदारीवर उभी असते.

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांनी 'गुजरात मॉडेल'ची मोठ्या प्रमाणावर जाहिरातबाजी आणि भव्य इव्हेंट्सच्या माध्यमातून देशासमोर मांडणी केली. कार्यक्षम प्रशासन, वेगवान निर्णय आणि उद्योगस्नेही धोरणांचे चित्र रंगवत जनतेचा विश्वास संपादन करण्यात आला. मात्र पुढील दशकात 'कामापेक्षा प्रचार अधिक' अशी कार्यपद्धती देशभर रूजत गेली. पेट्रोल पंपांपासून कोविड लसीच्या प्रमाणपत्रांपर्यंत सर्वत्र पंतप्रधानांचे छायाचित्र दिसू लागले. कोरोनाच्या अभूतपूर्व संकटात रुग्णांना बेड, ऑक्सिजन आणि औषधांची हमी देण्याऐवजी टाळ्या-थाळ्या आणि मोबाइल टॉर्चचे उपक्रम राबवले गेले. याच काळात पीएमकेअर फंडच्या नावाने स्वतंत्र संस्था उभारून मोठ्या प्रमाणावर निधी संकलित करण्यात आला; पण त्याच्या पारदर्शकतेविषयी प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. संसद किंवा माहिती अधिकाराच्या चौकटीत या निधीचा संपूर्ण हिशोब सादर केला गेला नाही. सत्तेच्या बळावर आभासी प्रतिमा उभी करणे आणि माध्यमांच्या सहाय्याने सत्य झाकून ठेवणे हीच कार्यपद्धती ठरली.

या वातावरणाचा परिणाम असा झाला की सत्तेच्या जवळच्या संस्था आणि व्यक्तींनीही याच धर्तीवर स्वतःचा प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला. प्रचारयंत्रणेच्या आधाराने अनेकदा हे प्रयत्न यशस्वी ठरले. परिणामी प्रशासन, संस्था आणि व्यक्ती यांच्यात दिखावूपणाची सवय निर्माण झाली. एआय इम्पॅक्ट समिटमध्ये गलगोटिया विद्यापीठाने केलेली बोगस सादरीकरणे उघडकीस आल्यानंतर 'गुजरात मॉडेल'पासून 'गलगोटिया पद्धती'पर्यंतचा प्रवास स्पष्ट दिसू लागला.

केंद्र सरकारने दिल्लीतील 'भारत मंडपम्'मध्ये पाच दिवसीय एआय इम्पॅक्ट समिटचे आयोजन केले होते. जगभरातील सुमारे पन्नास देशांचे प्रतिनिधी, गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचई आणि ओपन एआयचे सॅम ऑल्टमन यांसारखे तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज या परिषदेत सहभागी झाले होते. पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या परिषदेत शेकडो दालनांत विविध संशोधन, उपकरणे आणि नवतंत्रज्ञानाचे प्रदर्शन मांडण्यात आले. भारतीय स्टार्टअप्स आणि कंपन्यांनाही आपले काम जागतिक पातळीवर सादर करण्याची संधी मिळाली. अनेकांनी त्याचा प्रभावी वापरही केला.

परंतु याच परिषदेत गलगोटिया विद्यापीठाला दालन देण्यात आले आणि तेथे चीनमध्ये तयार झालेला रोबोटिक कुत्रा प्रदर्शित करण्यात आला. प्रतिनिधी आणि माध्यमांसमोर या उपकरणांचे विकासकार्य विद्यापीठातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये झाले असल्याचा दावा करण्यात आला. नंतर चिनी सोशल मीडिया आणि माध्यमांनी हे दावे खोटे ठरवले.

देशाची अधिकृत वृत्तवाहिनी डीडी न्यूजला संबंधित व्हिडिओ काढून टाकावे लागले. या प्रकारामुळे जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा मलिन झाली.

शिक्षणाच्या क्षेत्रात गुणवत्ता आणि संशोधनापेक्षा राजकीय सान्निध्य अधिक महत्त्वाचे ठरत असल्याची चर्चा उत्तर प्रदेश आणि दिल्ली परिसरात आधीपासूनच ऐकू येत होती. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० पूर्णपणे राबवणाऱ्यांमध्ये अग्रक्रम घेतल्याचा दावा करणाऱ्या या विद्यापीठाने अवघ्या सात वर्षांत २,४३० पेटंट्स दाखल केल्याचे सांगितले.

तुलनेत आयआयटी मद्राससारख्या प्रतिष्ठित संस्थेला पाच दशकांत सुमारे २,५५० पेटंट्सची नोंद आहे. या पार्श्वभूमीवर दाव्यांची विश्वासार्हता तपासण्याची गरज प्रकर्षाने जाणवते.

# निर्मला देवी जैन इंग्रजी शाळेत गाडगे महाराज जयंती निमित्त स्वच्छता अभियान

**वाशिम(प्रतिनिधी) :** शेलुबाजार येथील निर्मला देवी जैन शाळेत संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते या अभियानाची सुरुवात शाळेचे अध्यक्ष पियूष कर्णावट सर यांनी संत गाडगे महाराज यांच्या प्रत्तीमेचे पुजंन केले आणि सुरुवात करण्यात आली सर्वप्रथम हे अभियाना अंतर्गत सरकारी रुग्णालय शेलुबाजार या परिसराची पूर्ण स्वच्छता करण्यात आली त्यानंतर संपूर्ण अकोला रोड स्वच्छ केल्यानंतर शेलुबाजार मेन चौक बस स्टॉप या ठिकाणची स्वच्छता करण्यात आली बस स्टॉप वरील केलेली स्वच्छता ही सर्व



नागरिकांना एक विशेष आकर्षण ठरले व उपस्थित सर्व गणमान्य व्यक्तींनी उपक्रमाची स्तुती केली यानंतर संपूर्ण मालेगाव रोड स्वच्छ करण्यात आरा मशीन चौक शिव मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आले तसेच श्रीराम मंदिर परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला त्यानंतर पियुष कर्नाटक सर यांच्याकडून अभियानात सहभागी सर्व विद्यार्थ्यांना पाणी व सरबत चे वाटप करण्यात आले त्यानंतर श्री बालाजी मंदिर श्री हनुमान मंदिर व ग्रामपंचायत कार्यालय हा संपूर्ण परिसर विद्यार्थ्यांनी स्वच्छ केला आणि त्यानंतर बौद्ध विहाराची स्वच्छता करण्यात आली पोस्ट ऑफिस आणि मार्केट यार्ड मधील सर्व परिसर स्वच्छ व सुंदर करण्यात आला अभियानामध्ये सर्व परिसर स्वच्छ करत असताना विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व योग्यता दिसून आली परिसर स्वच्छ करत असताना अभियानासोबत कचऱ्याची घंटागाडी सुद्धा सोबत होती आणि विद्यार्थ्यांनी दिलेले जयघोष हे सर्व गावांमध्ये विशेष आकर्षण ठरले व सर्व अबाल वृद्ध नागरिकांनी स्वच्छतेचे कौतुक केले व शेवटी साई मंदिर परिसर स्वच्छ करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली प्रकारची स्वच्छता व अभियान शेलुबाजार मध्ये आधी कधीही झाले नाही असे नागरिकांनी मत व्यक्त केले व सदर अभियानाची तोंडभर कौतुक केले या अभियानाची संकल्पना शाळेचे अध्यक्ष पियुष कर्नावट यांनी मांडली व हे अभियान यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्राचार्य सुमित गिरे मुख्याध्यापक विकास खंडारे महेश राऊत कैलास भगत सागर म्हैसणे पवन मुखमाले अनिल मेटकर मेटकर अजित अंभोरे अंभोरे वंदना भोयर हर्षा लकडे संध्या गिरी श्रद्धा महल्ले इत्यादी सर्व शिक्षकांनी अभियानाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम केले आणि सहभागी सर्व विद्यार्थ्यांनी शेलुबाजार नगरीला पूर्णपणे स्वच्छ केले परिसर स्वच्छ करत असताना सर्व विद्यार्थ्यांनी आरोग्याची काळजी म्हणून मास्क हॅन्ड ग्लोज याचा वापर करूनच स्वच्छता केली परिसरातील सर्व नागरिकांची या अभियाना मार्फत स्वच्छतेबाबतीत जागरूकता करण्यात आली व स्वच्छतेचा मंत्र दिला गेला.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या वतीने संत गाडगेबाबा जयंती साजरी

**वाशिम (प्रतिनिधी) :** स्वामी विवेकानंद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोकलगाव ता. जि. वाशिम येथे NSS+2 च्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे दैवत वैराग्यमूर्ती गाडगे बाबा यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र काळबांडे हे होते. तर प्रमुख अतिथी शिक्षक सरोदे व क्रीडा शिक्षक हजारे हे होते .या कार्यक्रमाची सुरुवात वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.या प्रसंगी NSS+2 चे कार्यक्रम अधिकारी प्रा.अरविंद मोरे यांनी वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.तसेच यावेळी उपस्थित शिक्षकांनी देखील संत गाडगे महाराज यांच्या



जीवन चरित्रावर प्रकाश टाकून खऱ्या अर्थाने गाडगेबाबा यांचे विचार हे आजही प्रेरणादायी आहेत म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबांचा आदर्श घेणे ही काळाची गरज आहे.व संत गाडगे महाराजांना नुसतेच डोक्यावर न घेता त्यांचे विचार आत्मसात करणे देखील गरजेचे असल्याचे यावेळी सांगितले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व शिक्षक वृंद व राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थी उपस्थित होते.

## संत गाडगे बाबा यांना भारतरत्न पुरस्कार द्या – महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे..

**नाशिक रोड प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** भिमटोला सामाजिक संघटनेच्या वतीने संत गाडगे बाबा यांची १५० वी जयंती साजरी करुन नाशिक येथील पूर्ण कृती पुतळ्यास अभिवादन करून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला..ह्या प्रसंगी गांगुर्डे म्हणाले की संत गाडगे बाबा हे महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक होते त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेंडगाव येथे झाला त्यांनी आयुष्यभर स्वच्छता सेवा आणि शिक्षणाचा



संदेश दिला गाडगे महाराज अंधश्रद्धा व्यसनाधीनता आणि अज्ञानाविरुद्ध लढले ते गावोगावी फिरून लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत असत मानव सेवाच खरी ईश्वर सेवा हा त्यांचा मुख्य विचार होता त्यांनी कर्मकांडापेक्षा प्रत्यक्ष समाजसेवेला महत्त्व दिले अशा थोर संतास भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी केली..याप्रसंगी भिमटोला सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे, युवा नेते नंदूभाऊ जाधव, रेखाताई मोरे, नेहाताई बोराडे, कल्पनाताई राऊत, युवा नेते प्रशांत गांगुर्डे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## "रंग क्रीडेचे, ताल संस्कृतीचे" — पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयात युवक महोत्सव २०२६ ची दिमाखदार सुरुवात

**प्रदीप पोटफोडे/पाचोड. --** शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे 'युवक महोत्सव २०२६'चा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. 'रंग क्रीडेचे, ताल संस्कृतीचे' ही आकर्षक थीम यंदाच्या महोत्सवाचे वैशिष्ट्य होय क्रीडा, संस्कृती व साहित्य आणि तरुणाईचा उत्साह यांचा सुंदर संगम या महोत्सवातून अनुभवायला मिळाला. महोत्सवाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, युवक महोत्सव हा केवळ स्पर्धांचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा आणि संघभावना वृद्धिंगत करण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. शिक्षणासोबत क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास विद्यार्थ्यांच्या अंगी आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सकारात्मकता विकसित होते, असेही त्यांनी नमूद केले.

युवक महोत्सव म्हटले की विद्यार्थ्यांमध्ये नवा जल्लोष, नवचैतन्य आणि नवीन वातावरण निर्माण होते. उद्घाटनप्रसंगी कबड्डी या पारंपरिक खेळाचे आयोजन करण्यात



आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत मैदानावर जोशपूर्ण वातावरण निर्माण केले. दुपारच्या सत्रात कॅरम व बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या बौद्धिक आणि कौशल्याधारित स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्तम खेळाचे प्रदर्शन केले.सायंकाळी थाळीफेक व गोळाफेक स्पर्धांनी दिवसाची सांगता झाली. या स्पर्धांमुळे महाविद्यालयीन परिसरात खेळाडूवृत्तीचा आणि निरोगी स्पर्धेचा सुंदर प्रत्यय आला. दिवसभर चाललेल्या विविध स्पर्धांमुळे महाविद्यालय परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.या स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यासाठी क्रीडा विभागाचे संचालक डॉ. सुरेश नलावडे व प्रा.अरुणा दसपुते यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व उत्साही सहभाग नोंदविला.एकूणच, 'रंग क्रीडेचे, ताल संस्कृतीचे' या संकल्पनेला साजेसा रंगतदार प्रारंभ होत युवक महोत्सव २०२६ ची दिमाखदार सुरुवात झाली असून पुढील काही दिवस विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमुळे महाविद्यालयीन वातावरण अधिकच रंगणार आहे

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तुकाराम गावंडे यांनी केले तर आभार डॉ.गांधी बाणायत यांनी मानले याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव डॉ.हेमंत कुमार जैन डॉ.भगवान जायभाय डॉ. उत्तम जाधव डॉ.हरिप्रसाद बिडवे डॉ.सुभाष पोटभरे डॉ.संतोष चव्हाण प्रा. विनोद कांबळे प्रा.संदीप सातोनकर प्रा. सचिन कदम सतीश वाघ गजानन इंगळे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिका शिक्षण समिती अध्यक्षांसोबत मराठी शाळा व शिक्षक संघटनांचा विधायक संवाद

**भिवंडी (सुनील झळके) :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीच्या अध्यक्षा मा. श्रीमती राजेश्री शिरवडकर यांच्या सोबत शिक्षण तज्ञ डॉ.विशाल कडणे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी आयोजित संयुक्त बैठकीत मराठी शाळांचे संस्थाचालक व शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले. या बैठकीत महामुंबई शिक्षण संस्था, मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ तसेच विविध शैक्षणिक संघटनांनी शिक्षणाशी संबंधित गंभीर व प्रलंबित प्रश्नांवर निवेदन सादर करून सविस्तर चर्चा केली.

संघटनेच्यावतीने अध्यक्ष सदानंद रावराणे, उपाध्यक्ष



राजेंद्र प्रधान, कार्यवाह डॉ. विनय राऊत, शिक्षक नेते डॉ. विशाल कडणे तसेच फादर स्वामी यांनी नवनिर्वाचित शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांचे अभिनंदन करून शाळांच्या हितासाठी विधायक संवाद साधला. सादर केलेल्या निवेदनात शाळांवरील वीज, पाणी व इतर कर निवासी दराने आकारणी करण्याची मागणी, मालमत्ता करातून संपूर्ण सूट, आरटीई कायदा २००९ अंतर्गत अनावश्यक मुदतवाढ प्रक्रिया रद्द करणे, तसेच २५% आरटीई अंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीची प्रलंबित रक्कम तातडीने अदा करण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय, बीएमसी इमारतींमध्ये कार्यरत अनुदानित मराठी व प्रादेशिक माध्यमांच्या शाळांवरील वार्षिक १०% भाडेवाढ स्थगित करणे, भाडेतत्त्वावर दिलेल्या वर्गखोल्यांची संख्या कायम ठेवणे, वेतनेतर अनुदानाचा प्रश्न सोडवणे, तसेच शिक्षक व लिपिकांच्या रिक्त पदांमुळे निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्याची मागणी करण्यात आली.

प्राथमिक अनुदानित शाळांसाठी सरल (SARAL) पोर्टल लॉगिन उपलब्ध नसल्याने शिक्षक भरती व प्रशासकीय प्रक्रिया प्रलंबित राहात असल्याची बाबही अधोरेखित करण्यात आली.

शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांनी सर्व मुद्द्यांची सकारात्मक दखल घेतली असून, पुढील ८ ते १० दिवसांत पुन्हा बैठक आयोजित करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. ही बैठक शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांवर विधायक संवाद घडवून आणणारी ठरली असून, महानगरपालिका क्षेत्रातील शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी आणि सर्व स्तरांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## पातुर प्राथमिक आरोग्य केंद्राला राज्यस्तरीय वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी भारत चव्हाण/सारकिन्ही :** प्राथमिक आरोग्य केंद्र पातुर टिमला वंदनीय बाळासाहेब ठाकरे महाआरोग्य सन्मान 2026 सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील प्रेरणादायी कार्याचा गौरवशाली पुरस्कार प्राथमिक आरोग्य केंद्र पातुर टीमला महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री आदरणीय श्री प्रकाश आंबिडकर साहेबांच्या हस्ते गौरविण्यात आला.

अकोला जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या सातत्यपूर्ण व प्रभावी कामगिरीमुळे राज्यभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, जिल्ह्याच्या आरोग्य सेवेला नवे बळ मिळाले आहे.दि. २२ फेब्रुवारी २०२६** — राज्यातील आरोग्य निर्देशांकावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल डॉ. बळीराम गाढवे, जिल्हा आरोग्य अधिकारी, यांचा यशवंतराव चव्हाण सभागृह येथे मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.राज्यातील आरोग्य संस्था, डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांमधून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना दरवर्षी *वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार* प्रदान केला जातो. यामध्ये सोहळ्यात एक लाख रुपये रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह



देऊन सन्मान करण्यात येते.

या उल्लेखनीय यशामुळे जिल्हा परिषद अकोला आरोग्य विभागाचे राज्यभर कौतुक होत आहे.या सोहळ्यास मा ना प्रकाश आबीटकर (आरोग्यमंत्री), मा ना मेघनाताई बोर्डीकर (राज्य आरोग्यमंत्री) तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव व आयुक्त संचालक उप संचालक अकोला उपस्थित होते.

राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र पातुर (ता. पातुर, जि. अकोला) या संस्थेची निवड झाली. यानिमित्त वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश लोखंडे यांचा सन्मान करण्यात आला. अकोला जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या सातत्यपूर्ण व प्रभावी कामगिरीमुळे राज्यभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, जिल्ह्याच्या आरोग्य सेवेला नवे बळ मिळाले आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# सगरोळी रेती घाटातून देगलूर मार्गे अवैध रेती वाहतूक कर्नाटकात

## सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अमोल कुमार शिंदे यांचे देगलूर उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांना निवेदन

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने :** सगरोळी तालुका बिलोली जिल्हा नांदेड येथील वाळू घाटातून अवैध रेती वाहतूक सगरोळी मार्गे देगलूर मधून कर्नाटकात होत आहे.

सगरोळी तालुका बिलोली जिल्हा नांदेड वाळू घाट नुकतेच सुरू झाले असून वाळू घाट चालकाकडून सगरोळी मार्गे देगलूर तालुक्यामधून कर्नाटकामध्ये अवैध रेती वाहतूक होत आहे एकाच पावतीवर अनेक फेऱ्या करणे व प्रत्येक टिप्पर वाहनामध्ये ओव्हरलोड रेती भरण्यात येत आहे रेती वाहतूक दिवस-रात्र २४ तास चालू आहे हे रेती नेत असताना रोडवर रेती पडल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे.ही अवैध रेती वाहतूक बिलोली सह देगलूर या दोन तालुक्याया दोन तालुक्यातून विविध मार्गावरून चालत आहे ओव्हरलोड रेती वाहतुकीतील टिप्पर वाहनाची संख्या ७० ते ८० हून अधिक आहे.ओव्हरलोड रेती वाहतुकीस सगरोळी तालुका बिलोली रेती घाट चालक मुख्य असल्याचे दिसून येत आहे.तरी रेती वाहतूक शासनाच्या कोणत्याही निकषानुसार रेती वाहतूक होत नाही.रेती फक्त दिवसा वाहतूक करायची असते पण सर्व नियम धाब्यावर बसून दिवस-रात्र २४ तास रेती वाहतूक होत आहे.सगरोळी मार्ग देगलूर हुन रेती जात असताना देगलूर तहसील कार्यालयासमोरून व उपजिल्हाधिकारी कार्यालय समोरून ओव्हरलोड टिप्पर जात आहेत तरी देगलूर महसूल विभागाकडून कोणतीही कार्यवाही होताना दिसत नाही.

काही टिप्परना नंबर प्लेट सुद्धा नाहीत.तरी देगलूर तहसील कार्यालयाकडून व देगलूर उपजिल्हा अधिकारी यांच्याकडून या अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टिप्पर वर कार्यवाही करण्यात यावी असे निवेदन करते सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अमोल कुमार शिंदे. अंवैध रेती बंद करण्यात यावे अन्यथा अवैध रेती बंद न झाल्यास देगलूर उपजिल्हा कार्यालयालय समोर आमरण उपोषण करण्यात येईल याची प्रशासनाने नोंद घ्यावीअसे निवेदना मार्फत प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात आले.




# गाडगेबाबांच्या विचारांचा जागर व्हावा – उन्हवणे

**चांदोरी प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** राष्ट्रीय संत गाडगेबाबा महाराज यांचे जीवन कार्य समाजाला प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या विचारांचा जागर होत विचार समाजात पोहोचविण्यासाठी विचारवंतांची पिढी उभी राहणे आवश्यक आहे, असे युवा परिवर्तन क्रांतिदीप संस्थेचे अध्यक्ष राहुल उन्हवणे यांनी येथे सांगितले. गाडगे बाबांच्या जयंती निमित्त चांदोरी येथील प्राथमिक मराठी शाळेत तसेच संपूर्ण गावात जात त्यांनी गाडगेबाबांच्या वेशभूषेतून स्वच्छतेची जनजागृती केली. युवा परिवर्तन क्रांतिदीप संस्था व युवा क्रांती पोलीस मित्र शाखेतर्फे हा कार्यक्रम संपन्न झाला.



वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमासाठी गावातील ग्रामस्थ , तसेच सरपंच विनायक खरात, मंगेश भन्साळी वार्ताहर, जयश्रीताई अहिरे, सारिका ताई नागरे, सचिन भाऊ हिरे, वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष, गोकुळ लोखंडे पत्रकार साहेब, यांचे मार्गदर्शन मिळाले

# चिंचांबा पेन येथे महा रेशीम अभियानांतर्गत रेशीम कार्यक्रम संपन्न

**रिसोड प्रतिनिधी/ भाऊसाहेब सरनाईक :** तालुक्यातील मौजे चिंचंबा पेन येथे वाशिम जिल्हा महा रेशीम अभियानांतर्गत रेशीम विकास कार्यक्रम आयोजित केला होता त्यामध्ये जिल्हा रेशीम विकास अधिकारी माननीय फडके साहेब यांचे मार्गदर्शन लाभले. पारंपरिक पिकांसोबत एक एकर तुती लागवड करून विषमुक्त नैसर्गिक शेती केल्यास दुसऱ्या वर्षांपासून एकरी रु. 2 ते 3 लाख उत्पन्न कसे मिळते. हे उदाहरण दाखल सांगितले. गावातील युवकांनी नोकरीच्या मागे न



लागता रेशीम शेती पर्याय निवडावा असे आवाहन त्यांनी केले प्रथमता माननीय फडके साहेब यांचे स्वागत रेशीम शेतकरी दिगंबर शिवाजी राऊत यांच्या हस्ते करण्यात आले व या कार्यक्रमाला दुसऱ्या गावांमधून रेशीम शेती करणारे शेतकरी सुद्धा हजर होते त्यामध्ये सलग दोन वेळा रेशीमरत्न प्राप्त हराळ येथील माननीय रमेश प्रधान व मौजे मोप येथील किशोर नरवाडे बबन काळे व सवड येथील विलास तिवारी व व्याडयेथील श्री राजेंद्र चौधरी व शामराव राऊतहे सुद्धा उपस्थित होते यांचे सुद्धा गावातील शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले यामध्ये गावातील शेतकऱ्यांनी सुद्धा भरभरून प्रतिसाद दिला हजर असलेले प्रगतिशील शेतकरी रामदास सरनाईक संतोष मोरे डॉक्टर सतीश सरनाईक माधव शेजुळ विष्णू शेजुळ श्रीराम सरनाईक रोजगार सेवक संतोष राव जाधव व दत्ता मोळकर व सचिन बोरकर संदीप मोळकर तसेच गजानन मोळकर भागवत गीरी रामदास सरनाईक विठ्ठल खरसडे विनोदराव सरनाईक व शुभम सरनाईक व प्रज्वल सरनाईक दिगंबर आंबोरे संतोष नागोजी खोटे राजू सरनाईक व कृषी सखी शिवानी वाघ व समस्त गावकरी मंडळी उपस्थित होते व व कार्यक्रमाच्या अंततः आभार प्रदर्शन हे डॉक्टर विष्णू दिगंबर राऊत यांनी केले व कार्यक्रम सपन्न झाला.

# दिवा रेल्वे स्थानक परिसरातील बेकायदेशीर फेरीवाल्यांवर तात्काळ कारवाई करा–दिवा शहर नगरी हक्क समिती

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)दिवा (ठाणे) :** दिवा शहर नागरी हक्क समितीच्या वतीने ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समितीकडे दिवा रेल्वे स्थानक परिसरातील वाढत्या बेकायदेशीर फेरीवाल्यांविरोधात तात्काळ कारवाई करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.

दिवा रेल्वे स्थानकाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर फेरीवाले रस्ते अडवून बसत असल्यामुळे नागरिकांना ये-जा करण्यास गंभीर अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे सतत वाहतूक कोंडी होत असून आपत्कालीन सेवा, रुग्णवाहिका तसेच सार्वजनिक



वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे.

स्थानिक प्रशासनाकडे “No Hawking Zone” घोषित करण्याचा अधिकार असतानाही दिवा रेल्वे स्थानक व परिसरात त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे. परिणामी नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला असून नियमांचे उघड उल्लंघन सुरू आहे.

समितीच्या प्रशासनाला प्रमुख मागण्या :

दिवा रेल्वे स्थानक परिसर तात्काळ “No Hawking Zone” घोषित करावा.

सर्व बेकायदेशीर फेरीवाल्यांवर कठोर कारवाई करावी.

भविष्यात अशा अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी विशेष पथक नियुक्त करावे.नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.

जर प्रशासनाने याकडे दुर्लक्षया केले, तर दिवा शहर नागरी हक्क समिती नागरिकांसह तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिवा-शीळ नागरी हक्क समितीने दिला आहे.

यावेळी दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त शिव प्रसाद नागरगोजे यांना निवेदन देण्यात आले यावेळी समितीचे हिरा पाटील, ॲड.रोहिदास मुंडे, सचिन पाटील, विजय भोईर,तुषार पाटील,रोशन भगत,दिलीप भोईर,प्रकाश पाटील आदी उपस्थित होते

# संत गाडगे बाबा यांना जयंती निमित्त भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन

**भिवंडी (सुनील झळके) :** महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकान्वये रोजी संत गाडगे बाबा यांच्या जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर नवनिर्वाचित महापौर नारायण रतन चौधरी यांच्या शुभहस्ते आयुक्त अनमोल सागर व मा. उप-महापौर मोमीन अब्दुल तारिक बारी यांच्या उपस्थितीत संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त




विठ्ठल डाके, अतिरिक्त आयुक्त नयना ससाणे, उप-आयुक्त (मुख्यालय) विक्रम दराडे, मा. उप-आयुक्त (कर) बाळकृष्ण क्षिरसागर, शहर अभियंता श्री. जमिल पटेल, अति.शहर अभियंता सचिन नाईक, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा संदिप पटणावर, सहा. आयुक्त (निवडणुक) नितीन पाटील, करमुल्यांकन अधिकारी सुधीर गुरव, उद्यान अधिक्षक निलेश संखे, शहर विकास विभाग प्रमुख अरविंद घुगरे व अधिकारी,कर्मचारी वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.

# नाशिक जिल्ह्यात आजाद समाज पार्टीचा जोरदार झंझावत दिंडोरी तालुक्यात शाखा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला!

**लखमापुर प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** आजाद समाज पार्टी (कांशीराम) च्या नाशिक जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी दिंडोरी तालुक्यात जोरदार शक्तीप्रदर्शन केले. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी तालुक्यातील वरखेडा, परमोरी आणि लखमापूर फाटा या तीन ठिकाणी पक्षाच्या नवीन शाखांचे भव्य उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमात शेकडो युवकांनी पक्षात प्रवेश करून आजाद समाज पार्टीचे हात अधिक बळकट केले. पक्ष नवीन असूनही, त्याचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार एड. चंद्रशेखर आजाद हे संसदेत (लोकसभा) प्रतिनिधित्व करत आहेत. उत्तर प्रदेशातील नगीना



लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले चंद्रशेखर आजाद यांनी भीम आर्मीच्या माध्यमातून दलित-बहुजन समाजावरील अत्याचारांविरुद्ध अखंड संघर्ष केला असून, संविधानाचे रक्षण, सामाजिक न्याय आणि उपेक्षित वर्गांच्या सशक्तीकरणासाठी सातत्याने लढा देत आहेत. त्यांच्या दूरदृष्टीने आजाद समाज पार्टीला बहुजन समाजाच्या हक्कांसाठी एक मजबूत व्यासपीठ मिळाले आहे. प्रदेशाध्यक्ष मनिष साठे यांचे सह जिल्हाध्यक्ष साहिल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला. प्रमुख उपस्थितांमध्ये युवा प्रभारी अमोल आहेर, युवा प्रदेश महासचिव संदीप मोरे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष मुकेश गांगुर्डे, नाशिक जिल्हा उपाध्यक्ष विजय मोरे, नाशिक शहराध्यक्ष मनोज हिरे, दिंडोरी तालुकाध्यक्ष वैभव शार्दुल, उपअध्यक्ष अजित बर्डे तालुका कार्यअध्यक्ष स्वप्नील गांगुर्डे तालुका संघटक तुषार साळवे तालुका सपर्क प्रमुख फैजान मनियार तालुका सचिव कृष्णा जगताप तालुका प्रसिद्ध प्रमुख किशोर शेळके वणी शहर अध्यक्ष प्रफुल केदारे तालुका सचिव तीरुपती गांगुर्डे वरखेडा शाखा अध्यक्ष संतोष निकम दत्तु कडाळे रोहित डंबाळे ओम गांगुर्डे राहुल गागुर्डे मुन्ना गांगुर्डे कुंदन गांगुर्डे लखमापुर फाटा अध्यक्ष प्रज्वल सोनवणे विवेक बागुल विवेक पवार विजय सोनवाने समाधान सोनवाने सिध्दार्थ सोनवने मनोज कावळे राकेश साळवे आदी उपस्थित होते

यांच्यासह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शाखा उद्घाटनामुळे दिंडोरी तालुक्यात पक्षाची संघटना अधिक मजबूत होत असून, युवा वर्गात प्रचंड उत्साह संचारला आहे. आजाद समाज पार्टी महाराष्ट्रातही वेगाने विस्तार करत असून, संविधान रक्षण आणि सामाजिक समतेच्या लढ्यात सक्रिय सहभाग घेत आहे.

भविष्यात अशा कार्यक्रमांमुळे पक्ष अधिकाधिक बळकट होईल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

### ‘चेक अनादर (बाऊंस)’ झाल्यास दाखल होणार गुन्हा

# कारवाई टाळण्यासाठी महावितरणची दिशाभूल करणाऱ्यां विरुध्द कारवाईच्या हालचालींना वेग

थकीत वीज बिलाची कारवाई टाळण्यासाठी न वटणारे धनादेश देत महावितरणची दिशाभूल करत वेळ मारून नेणाऱ्या वीज ग्राहकांवर गुन्हा दाखल करण्याच्या हालचालींना अमरावती परिमंडळात वेग देण्यात आला आहे. अशी माहिती मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिली आहे.

महावितरणच्या लघुदाब वर्गवारीतील वीज ग्राहकांनी विजबिल भरण्यासाठी दिलेल्या धनादेशांपैकी अमरावती परिमंडळात दरमहा सुमारे सरासरी १५० धनादेश अनादरीत (चेक बाऊंस) होत असल्याचे दिसून येत आहे. परंतू महावितरणच्या असे लक्षात आले की, काही वीज ग्राहकांनी दिलेल्या धनादेशावर चुकीची तारीख, खाडाखोड, चुकीची स्वाक्षरी, चुकीचे नाव, खात्यात पुरेशी रक्कम नसणे आदी कारणांवरून धनादेश अनादरित होत असल्याचे आढळून येत आहे.

परिणामी वीज बिलाची वसूली न होता थकबाकीत वाढ झाली आहे. त्यामुळे महावितरणने मोहिम घेत धनादेश अनादर झालेल्या वीज ग्राहकांवर कारवाई करण्याच्या दृष्टिने हालचालींना गती दिली आहे. सोबतच चेक बाऊंस झाल्यास वीज ग्राहकांना प्रत्येक वीज बिलासाठी विलंब आकार अधिक जीएसटी करासह ८८५/- रुपयांचा दंड संबंधित ग्राहकाच्या पुढील महिन्याच्या वीज बिलामध्ये इतर आकार म्हणून समाविष्ट करण्यात येते. तसेच अनादरित झालेल्या एकाच धनादेशाद्वारे अनेक वीजबिलांचा भरणा केलेला असल्यास प्रत्येक वीजबिलासाठी स्वतंत्र दंडात्मक रक्कम लावण्यात येते.

यासोबतच धनादेशाद्वारे वीजबिल भरण्याची सोय सहा महिन्यांसाठी निलंबित करण्याची कारवाई करण्यात येते.फेब्रुवारी महिन्याच्या २२ दिवसात परिमंडळात २७ लाख रुपयांचे १२० धनादेश बाऊंस झाले असून यात अमरावती जिल्ह्यातील ८५ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ३५ धनादेशाचा समावेश आहे.

## शारदा इंग्लिश स्कूल मध्ये बालधमाल कार्यक्रम ; विविध कार्यक्रमांनी जिंकली सर्वांची मने




महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने :** देगलूर तालुक्यातील हानेगाव येथील शारदा इंग्लिश स्कूल मध्ये बालधमाल हा कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने परिसरातील असंख्य पालक व रसिक मंडळीची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली विद्यार्थी व विद्यार्थिनी देशभक्तीपर गीत, हिंदी व मराठी गाणी या विविध अभिनय व कलाकृती सादर करून रसिकांचे मनोरंजन केले. एकापेक्षा एक सरस अभिनय व नृत्यकलेने रसिकांना खळखळून हसवले.

**बालधमाल कार्यक्रमांना यांची होती उपस्थिती**

या कार्यक्रमासाठी शंकरलींग शिवाचार्य महाराज, तंटामुक्ती अध्यक्ष योगेश देशमुख हनेगावकर, माझी मार्केट कमिटी सभापती विवेक पंडकठवार, मरखेल पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवि हुडेंकर, देगलूर येथील पत्रकार विशाल पवार,हनेगाव मधील प्रतिष्ठित नागरिक यांच्यासह परिसरातील विद्यार्थी व पालक उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थाचालक कैलास यसगे, राजीव पंदरगे,भालके सावकार,व शाळेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## रोगराईचे संकट ! गटार तुंबल्याने रामनगर (अ) परिसरात घाणीचे साम्राज्य ; परिसरातील नागरिक हैराण

महाराष्ट्र जीत

**घाटकोपर,(केतन भोज) :** प्रभाग क्रमांक १२७ मधील रामनगर (अ) येथील शंकर मंदिर शेजारील पाण्याच्या टाकी मागील मुख्य गटाराची अत्यंत दुरवस्था झाली आहे.हे गटार तुंबलेल्या अवस्थेत असून या गटारामधील सर्व घाणीचे पाणी मोठ्या प्रमाणावर मुख्य रस्त्यावर येत असून,येथील स्थानिक नागरिकांना तसेच शाळकरी मुलांना या तुंबलेल्या गटाराच्या पाण्यातूनच येजा करावी लागत आहे.परिणामी यामुळे स्थानिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.तसेच मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असलेल्या या परिसरातील नागरिकांचे आरोग्य यामुळे धोक्यात आले आहे.या तुंबलेल्या गटारामुळे याठिकाणी डासांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव वाढला आहे.त्यामुळे येथील नागरिकांना डेंग्यू सदृश्य आजारांचा





धोका निर्माण झाला आहे.तसेच बाजूलाच येथील संपूर्ण विभागला पाणी पुरवठा करणारी पाण्याची टाकी असून या पाण्याच्या टाकी मध्ये देखील या तुंबलेल्या गटाराचे घाणीचे पाणी जात असून यामुळे स्थानिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न याठिकाणी उद्भवत आहे.या संदर्भात स्थानिक नागरिकांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते अँड. करण इंगवले यांनी संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाने यासंदर्भात वेळेवेळी तक्रारी केल्या तरी ही मनपा एन विभाग प्रशासनाने याकडे लक्ष दिले नाही.मनपा एन विभाग प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करून देखील ते याकडे कानाडोळा करताना दिसत आहेत.

तरी संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाकडून या तुंबलेल्या गटाराची त्वरित स्वच्छता करण्यात यावी.तसेच दुरवस्था झालेल्या या गटाराचे व्यवस्थित बांधकाम करणे देखील गरजेचे आहे.अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहे.



**येथील स्थानिक नागरिकांना निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींकडून फक्त विकासाची आश्वासने देण्यात आली होती,पण वास्तवात मात्र नागरिकांना याठिकाणी मोठ्या प्राणावर घाणीचा त्रास सहन करावा लागत आहे. तरी येथील स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांसाठी याठिकाणी कोणीही वाली नसल्याचे दिसत आहे.तसेच मनपा एन विभाग प्रशासनाकडून या गंभीर समस्येबाबत कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना होत नसून,वारंवार तक्रारी करुन देखील त्यांच्याकडून यावर कार्यवाही शून्य कारभार होताना दिसत आहे.**

**- अँड.करण इंगवले**
**सामाजिक कार्यकर्ता**

## स्मार्ट मीटरमुळे दिवसा वीजेचा वापर स्वस्त ; अचलपुर विभागात स्मार्ट मीटरच्या सवलतीचे आणि सुविधाचे पथनाट्यातून जागर

महाराष्ट्र जीत

**अमरावती :** स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना मिळणाऱ्या सुविधा आणि सवलतीचे महावितरण अचलपूर विभागात पथनाट्याच्या माध्यमातून जागर करण्यात येत आहे. स्मार्ट मीटरमुळे वीजेचे बिल जास्त येते ही अफवा असून स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना शंभर टक्के अचूक बिल मिळते, शिवाय दिवसा वीज वापरावर प्रती युनिट ८० पैश्याची सवलत मिळत असल्याची माहिती या पथनाट्यातून देण्यात येत आहे.

मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या



पुढाकाराने जिल्ह्यात महावितरणतर्फे (९ ते २३ फेब्रुवारी) स्मार्ट मीटर जनजागृती पंधरवाडा राबविण्यात येत आहे. जनजागृती पंधरवाड्याचाच भाग म्हणून कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांचे संकल्पनेतुन निर्मित पथनाट्याची निर्मिती करण्यात आली असून दर्यापुर उपविभागीय कार्यालयातील तांत्रिक कर्मचाऱ्यांनी उत्सफूर्त सहभाग नोंदवत गर्दीच्या ठिकाणी जावून पथ नाट्याचे सादरीकरण करून वीज ग्राहकांना बोली भाषेत स्मार्ट मीटरच्या सुविधाची माहिती देत आहे .महावितरण अचलपूर विभागात अचलपूर, परतवाडा आणि अंजनगावसुर्जी याठिकाणी पथनाट्याचे प्रयोग झाले आहे. वीज ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, मीटर विषयी शंका असल्यास त्या दुर करण्यात येणार आहे.

तसेच स्मार्ट मीटरमुळे दिवसा सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मिळणाऱ्या विजेच्या वापरात प्रत्येक युनिटमागे ८० पैशाची सवलत देण्यात येते, त्यामुळे जास्त वीज वापर असलेली कामे स्वस्त विजेच्या वेळेत करण्याचे आवाहनही पथनाट्यातून करण्यात येत आहे.

आधुनिक तंत्रज्ञावर आधारीत असलेले स्मार्ट मीटर स्वंयचलीत आणि वेळेत मीटर वाचन करत असल्याने, वीज बिलाशी संबंधित तक्रारी शंभर टक्के संपूष्टात येणार आहे.

तसेच मीटरमुळे प्रत्येक तासाला वीज ग्राहकांना आपला वीज वापर किती झाला हे देखील मोबाईल एपवर समजण्याची सुविधा असल्याने वीज वापरावर सहज नियंत्रण मिळवता येणे शक्य आहे. अश्या अनेक लाभाची माहिती पथनाट्यातून वीज ग्राहकांना देण्यात येत आहे.

## चांदोरी गोदावरी नदीपत्रात बुडून तरुणाचा दुर्दैवी अंत गोदावरी नदी पात्रातील पानवेलींचा पहिला बळी

महाराष्ट्र जीत

**चांदोरी प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** चांदोरी येथील रहिवासी रवींद्र गंगाराम झुरडे(३४) या तरुणाचा गोदावरी नदीपात्रातील पानवेलींमुळे पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून दुर्दैवी अंत झाला. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे त्याच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, भाऊ असा परिवार आहे.{निफाड तालुक्यातील चांदोरी सायखेडा परिसरातील नदीपात्रात अनेक दिवसांपासून पानलवेलींनी विळखा घातला आहे. यामुळे नदीपात्रात पाण्याचा अंदाज येणे मुश्किल झाले आहे. यापूर्वीही अशा दुर्घटना घडू नये याबाबत वृत्तही प्रसिद्ध झालेले होते. परंतु प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे आज या नदीपात्रात तरुणाला आपला जीव गमवावा लागला यामुळे



परिसरातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. जर प्रशासनाने वेळीच पानवेली हटविल्या असत्या तर तरुणाला जीव गमविण्याची वेळ आली नसती. }

## आदिवासी समाजाची विशेष पदभरती कधी करता ? ट्रायबल फोरमचा सरकारला सवाल,सात वर्षापासून भरती रखडली

महाराष्ट्र जीत

गेल्या चार दशकापासून राज्यातील शासकीय,निमशासकीय, शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका,विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये,शासकीय व खाजगी शिक्षण संस्था यांच्या आस्थापनेवरील अनुसूचित जमातीची १२ हजार ५२० पदे खोट्या जातप्रमाणपत्राच्या आधारे शासनाची फसवणूक करुन बिगर आदिवासींनी बळकावलेली आहेत. ही पदे भरण्यासंदर्भात विधिमंडळ अधिवेशनात वारंवार प्रश्न उपस्थित झाले मात्र अद्यापही विशेष पदभरती करण्यात आलेली नाहीत.

शासनाने गेल्या सात वर्षात ज्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर वर्ग केले.त्या



पदांच्या विविध विभागातील जाहिराती तीन महीण्यात काढण्यात येणार होत्या. याबाबत ८ सप्टेंबर २०२५ रोजी सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली होती.या बैठकीला आदिवासी समाजाचे सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. जाहिराती काढण्याची जबाबदारी सामान्य प्रशासन विभागावर सोपविण्यात आली होती.परंतु गेल्या पाच महिण्यात कोणत्याही विभागाची जाहिरात काढण्यात आलेली नाही. आदिवासी समाजाला आणखी किती वर्षे भूलथापा देणार ? असा सवाल ट्रायबल फोरमने राज्य सरकारला केला आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या २१ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीची बळकावलेली पदे ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत रिकामी करुन भरायची होती.परंतू ती पदे भरण्यात आलेली नाही. या संदर्भात 'ट्रायबल फोरम' या संघटनेने सातत्याने राज्य शासनाकडे पाठपुरावा केला. पण सरकारला आदिवासी समाजाच्या विशेष पदभरतीचा विसर पडला आहे.

आदिवासींच्या, बिगर आदिवासींनी बनावट जातप्रमाणपत्राच्या आधारे बळकावलेल्या १२ हजार ५२० पदांपैकी आजपर्यंत केवळ ६ हजार ८१० पदे रिकामी केली असून यापैकी केवळ १ हजार ३४३ पदेचं भरण्यात आली आहे. अद्यापही ११ हजार २२७ अनुसूचित जमातीचे उमेदवार आपल्या घटनात्मक हक्काच्या नोकरीपासून वंचित आहे.

**राज्यघटनेवर अत्याचार करुन दिले संरक्षण**

राज्य शासनाने १५ जून १९९५,२४ जून २००४,३० जून २००४,३० जुलै २०१३,२१ ऑक्टोंबर २०१५ असे पाच शासन निर्णय निर्गमित करुन बिगर आदिवासींना संरक्षण दिले आणि राज्यघटनेतील तरतुदींवर अत्याचार केला होता.१५ जून १९९५ ते ३१ ऑगस्ट २०१५ या २० वर्षाच्या कालावधीत राज्य शासनाने आदिवासींच्या राखीव जागांवर नियुक्त बिगर आदिवासींना बेकायदेशीर नियुक्त्या दिलेल्या होत्या.सर्वोच्च न्यायालयाच्या ६ जुलै २०१७ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे पाच शासन निर्णय रद्द करुन या अधिकारी, कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर वर्ग करण्यात आले आहेत.

**शासन सेवेत ६३ हजार ६९३ आदिवासी कर्मचारी**

३१ ऑगस्ट २०१५ च्या शासनाच्या आकडेवारीनुसार २९ विभागात अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या ६३ हजार ६९३ आहेत. त्यापैकी जातवैधता प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांची संख्या ५१ हजार १७३ आहे.वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्यांची संख्या १२ हजार ५२० आहे. जातवैधतेसाठी समितीकडे प्रलंबित प्रकरणे ५ हजार ९५३ आहे. जातवैधतेसाठी समितीकडे अर्ज सादर न करणारे २ हजार ३५१ आहे.न्यायालयाने स्थगिती दिलेली प्रकरणे ६०२ आहेत.

" भारतीय संविधानाने आदिवासी समाजाला सात टक्के आरक्षण दिले आहे.या सात टक्के आरक्षणापैकी गेल्या चार दशकात केवळ तीनच टक्के आरक्षणाचा लाभ आदिवासी समाजाला मिळाला आहे. चार टक्के आरक्षण बनावट जातप्रमाणपत्राच्या आधारे बिगर आदिवासींनी लुटले आहे. आमच्या घटनात्मक हक्काच्या सर्वच राखीव जागा भरुन आदिवासी समाजाला न्याय द्यावा.

**- सुनील झळके**
**कार्याध्यक्ष, ट्रायबल फोरम कोकण विभाग**

## भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन !



महाराष्ट्र जीत

**वासिंद :** राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान कांबा या प्रतिष्ठानच्या वतीने व उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालय रक्तपेढी यांच्या सहयोगाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कांबा येथे पार पडलेल्या या रक्तदान शिबीरात कल्याण, डोंबिवली, रायते, गोवेली येथील जवळपास पन्नास पेक्षा अधिक रक्तदात्यांनी सहभाग घेत यामध्ये चार महिलांनीही रक्तदान केले. या शिबिरासाठी उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयाचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. विलास वाघमारे, वैज्ञानिक अधिकारी डॉ. हरिश बागडे, डॉ. राजकुमार पवार, डॉ. प्रमोद जाधव, डॉ. अनुष्का झुंजाराव, डॉ.अपूर्व बोरसे, डॉ. विशाल शेलार, रुग्ण परिचर संदीप कांबळे, आकाश गायकवाड आदी कर्मचारी यांनी सहकार्य केले. या शिबिरावेळी पोलिस निरीक्षक पंकज गिरी, पो.उप.नि. प्रशांत जाधव, जि.प.शाळेचे माजी मुख्याध्यापक वसंत काटे, मुख्याध्यापक राजेश वेखंडे, प्रतिष्ठानचे सदस्य रुपेश गायकर, सामाजिक कार्यकर्ते आत्माराम बनकरी, उद्योजक अनंता ठाकरे, मंगेश बनकरी, दिपक म्हारसे, गणेश बनकरी, दिपक शिरोशे, ग्रामसेविका सुनंदा पाटील आदी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## "हिंद दी चादर" गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त ठाण्यात समूहगान कार्यक्रम

महाराष्ट्र जीत

**ठाणे :** "हिंद दी चादर" म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी आयोजित कार्यक्रमांच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, पाचपाखाडी, ठाणे येथे दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता विशेष समूहगान कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गुरु तेग बहादूर यांच्या जीवनकार्यावर आधारित सादर केलेले प्रेरणादायी गीत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्या सहभागातून सामूहिकरित्या गायन करण्यात आले. समूहगानातून गुरु तेग बहादूर यांच्या बलिदान, धर्मस्वातंत्र्य व मानवतेच्या मूल्यांची आठवण उपस्थितांना करून देण्यात आली.

या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, प्रकल्प संचालक (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड, उपशिक्षणाधिकारी (योजना) शुभांगी बढे, विस्तार अधिकारी (शिक्षण) आशिष झुंझारराव, जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे तसेच मुख्याध्यापिका मानसी मिलिंद ढवळीकर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची माहिती नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचते, असे मत व्यक्त केले.

तसेच ठाणे जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये "हिंद दी चादर" गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त समूहगान कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी वर्गाने विविध शाळांना भेट देऊन या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला व विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदविला. देशभक्ती, त्याग व मानवतेचा संदेश देणाऱ्या या समूहगान उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. आगामी २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी होणाऱ्या मुख्य शहीदी समागम कार्यक्रमासाठी या उपक्रमातून सकारात्मक वातावरण तयार झाल्याचे आयोजकांनी सांगितले.